महाराष्ट्र शासन

क्रमांक : मप्रन्या-२०२०/१२९/प्र.क्र.४९/का.३८,
सामान्य प्रशासन विभाग, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २५ ऑगस्ट, २०२०.

प्रति,

संचालक (माहिती तंत्रज्ञान),
माहिती तंत्रज्ञान महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई -३२.

**विषय :- जाहिरात देण्याबाबत.**

महोदय,

सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणातील सदस्य (न्यायिक) व सदस्य (प्रशासकीय) या पदांसाठी इंग्रजी, हिंदी व मराठी वृत्तपत्रांमध्ये जाहिरात द्यावयाची आहे. जाहिरातीचे दोन मसुदे (मराठी व इंग्रजीमध्ये) सोबत जोडले आहेत. तरी सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर "नवीन संदेश" या मथळ्याखाली प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपली,

(जयश्री गणेकर)
अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग

सहपत्र : वरीलप्रमाणे

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

General Administration Department

Applications in prescribed form for appointment for the posts mentioned in Annexure-I below, from willing candidates, who fulfil the eligibility criteria, are invited by the Deputy Secretary (Desk No.38), General Administration Department, Government of Maharashtra. The posts are tenure posts and the conditions of service of a member shall be the same as applicable to a Judge of the High Court. A person selected is liable to be posted or transferred to any place having the Bench of the Maharashtra Administrative Tribunal. Prescribed forms will be provided through Email-shriram.yadav@nic.in on demand. Please mention Judicial or Administrative post in the Email. The applications in prescribed form should be sent personally/ courier/ speed post or registered post to Desk Officer (Desk No.38), General Administration Department, 3rd floor, Mantralaya (Main Building), Hutatma Rajguru chowk, Madam Cama Road, Mumbai 400 032 on or before 12th October 2020. The application received after due date will not be considered.

This advertise is available at the website of Government of Maharashtra www.maharashtra.gov.in under the tab "New Messages"

Details of the post are given in the Annexure I

Sd/-
( Jayashree Ganekar )
Under Secretary
Government of Maharashtra

ANNEXURE-I

| | | |
|---|---|---|
| 1 | Name of the Post | Member (Judicial) & Member (Administrative) |
| 2 | Number of Post | Three |
| 3 | Place of Posting | place / post / date the post got vacant / to be vacant on<br>1) Nagpur : Member(Judicial ) 20.03.2019<br>2) Mumbai : Member (Administrative) 27.07.2021<br>3) Mumbai : Member(Judicial) 25.08.2021 |
| 4 | Pay Scale | Rs. 80,000/-(as per 6th pay commission), Rs.2,25,000/-(as per 7th pay commission) plus allowances and other facilities as per rules. In case of appointment of retired officer, pension if any shall be deducted from the basic pay. |
| 5 | Tenure of Appointment | The tenure of appointment shall be 5 years or up to the completion of 65 years of age, **whichever is earlier**. |
| 6 | Eligibility Criteria for Member **Judicial** | The candidate unless he is or qualified to be a Judge of a High Court or he has for at least two years held the post of a Secretary to the Government of India in the Department of Legal Affairs or the Legislative Department including Member-Secretary, Law Commission of India or held a post of Additional Secretary to the Government of India in the Department of Legal Affairs and Legislative Department at least for a period of five years. |

| | | |
|---|---|---|
| 7 | Eligibility Criteria for Member **Administrative** | Unless candidates has held at least two years the post of secretary to the Government of India or any other post under the Central or State Government and carrying the scale of pay which is not less than that of a secretary to the Government of India for at least two years or held a post of Additional Secretary to the Government of India at least for five years or any other post under the Central or State Government carrying the scale of pay which is not less than that of Additional Secretary to the Government of India at least for a period of five years.<br>Provided that the officers belonging to All-India services who were or are on Central deputation to a lower post shall be deemed to have held the post of Secretary or of Additional Secretary, as the case may be, from the date such officers were granted proforma promotion or actual promotion whichever is earlier to the level of Secretary or of Additional Secretary, as the case may be, and the period spent on Central deputation after such date shall count for qualifying service for the appointment. |
| 8 | Duties attached to the post | To discharge judicial duties in deciding cases before Maharashtra Administrative Tribunal as a Member (Administrative )(Judicial) either in Single Judge Bench or in Division Bench as the case may be. |

## महाराष्ट्र शासन

### सामान्य प्रशासन विभाग

खालील जोडपत्र-१ मध्ये नमूद केलेली महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणातील रिक्त होणारी पदे भरण्याकरिता उप सचिव (कार्यासन-३८), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन हे अर्ज मागवित आहेत. सदर पदे ही सावधि-नियुक्ती (tenure post) पदे असून सदर सदस्यांच्या सेवाशर्ती उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांप्रमाणे असतील. या पदासाठी निवड झालेली व्यक्ती महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाचे खंडपीठ असलेल्या कोणत्याही ठिकाणी नियुक्ती किंवा बदलीस पात्र असेल. विहित नमुन्यातील अर्जाची मागणी shriram.yadav@nic.in या या ईमेलवर केल्यानंतर ई-मेलद्वारे अर्ज उपलब्ध करुन देण्यात येतील. ई-मेल मध्ये "न्यायिक" किंवा "प्रशासकीय" पद असे नमूद करावे. विहीत अर्हता पूर्ण करीत असलेल्या इच्छुक उमेदवारांनी आपले विहीत नमुन्यातील अर्ज कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.३८, सामान्य प्रशासन विभाग, तिसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० पर्यंत प्रत्यक्ष/ कुरिअर/ स्पीडपोस्ट किंवा नोंदणीकृत डाकेने सादर करणे आवश्यक आहे. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर "नवीन संदेश" या मथळ्याखाली उपलब्ध आहे.

पदाचा तपशील जोडपत्र-१ मध्ये नमूद करण्यात आला आहे.

सही/-<br>
( जयश्री गणेकर )<br>
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पदाचे नाव | | सदस्य (न्यायिक) व सदस्य (प्रशासकीय) |
| २. | पदाची संख्या | | तीन |
| ३. | नियुक्तीचे ठिकाण | | ठिकाण पदनाम पद रिक्त झालेला / होण्याचा दिनांक<br>१. नागपूर : सदस्य (न्यायिक) २०.०३.२०१९<br>२. मुंबई : सदस्य (प्रशासकीय) २७.०७.२०२१<br>३. मुंबई : सदस्य (न्यायिक) २५.०८.२०२१ |
| ४. | वेतनश्रेणी | | रु.८०,०००/- (सहाव्या वेतन आयोगानुसार), रु.२,२५,०००/- (सातव्या वेतन आयोगानुसार) अधिक भत्ते व इतर सोयीसुविधा नियमाप्रमाणे. निवृत्त अधिकाऱ्यांना नियुक्तीच्या बाबतीत निवृत्तीवेतन मूळ वेतनातून वजा करण्यात येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | नियुक्तीची मुदत | | नियुक्तीची मुदत ५ वर्षे किंवा वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यत हयापैकी जे आधी होईल तोपर्यंत |
| ६. | अर्हता<br>न्यायिक | | उच्च न्यायालयाचे न्यायाधीश असणे किंवा उच्च न्यायालयाचे न्यायाधीश होण्यास पात्र असणे किंवा सदस्य-सचिव, भारतीय विधी आयोग या पदासह केंद्र शासनाच्या विधी किंवा वैधानिक विभागात "सचिव" म्हणून २ वर्षे पद धारण केलेले असणे किंवा किमान ५ वर्षाच्या कालावधीसाठी केंद्र शासनाच्या विधी किंवा वैधानिक विभागात "अतिरिक्त सचिव", पद धारण केलेले असणे आवश्यक आहे. |
| ७. | अर्हता<br>प्रशासकीय | | केंद्र शासनाकडील "सचिव" हे पद कमीत कमी २ वर्षे धारण केलेले आहे किंवा केंद्र शासन किंवा राज्य शासनातील ज्या पदाची वेतनश्रेणी केंद्र शासनाच्या सचिव पदाच्या वेतनश्रेणीपेक्षा कमी नाही असे अन्य कोणतेही पद कमीत कमी २ वर्षे धारण केलेले आहे किंवा केंद्र शासनाच्या अतिरिक्त सचिव पदावर कमीत कमी ५ वर्षे काम केले आहे किंवा केंद्र शासन किंवा राज्य शासनातील ज्या पदाची वेतनश्रेणी केंद्र शासनाच्या अतिरिक्त सचिव पदाच्या वेतनश्रेणीपेक्षा कमी नाही असे अन्य कोणतेही पद कमीत कमी ५ वर्षांकरिता धारण केलेले आहे अशा व्यक्ती नियुक्तीस पात्र आहेत.<br>परंतु, अखिल भारतीय सेवेतील अधिकारी निम्न पदावर केंद्रीय प्रतिनियुक्तीवर होते किंवा असतील तर त्यांच्या बाबतीत असे समजण्यात येईल की, ज्या दिनांकापासून अशा अधिकाऱ्यांना प्रपत्र पदोन्नती किंवा प्रत्यक्ष पदोन्नती यापैकी जी आधी देण्यात आली आहे त्या दिनांकापासून त्यांनी सचिव किंवा अतिरिक्त सचिवाचे पद धारण केले आहे आणि अशा दिनांकानंतरच्या केंद्रीय प्रतिनियुक्तीवर व्यतीत केलेल्या कालावधीची गणना सदर पदाच्या नियुक्तीसाठीच्या अर्हतेमध्ये केली जाईल. |
| ८. | पदाशी निगडीत कर्तव्ये | | सदस्य (प्रशासकीय) / (न्यायिक) या नात्याने महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणासमोर निर्णयासाठी येणाऱ्या प्रकरणात एकतर एक न्यायाधीश खंडपीठ किंवा खंडपीठ विभाग जे असेल त्यात न्यायिक कर्तव्ये पार पाडणे. |